यशोगाथा....

# श्री. बापुराव मांजरे यांना मिळाले टोमॅटो लागवडीतून लाखोंचे उत्पन्न



"मराठवाडा म्हंटल कि डोळ्यासमोर चित्र उभ राहत ते दुष्काळाच, पाणी टंचाईच, आत्महत्याग्रस्त भागाचं आणि कोरडवाहू शेतीच, पण याच मराठवाड्यातल्या उस्मानाबाद जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त परंडा तालुक्यातील भोंजा गावातील शेतकरी श्री. बापुराव वासुदेव मांजरे व त्यांचे पुत्र दयानंद बापुराव मांजरे यांनी मेहनतीच्या आणि अथक कष्टाच्या जोरावर पाऊण एकर टोमॅटो पिकातून आत्तापर्यंत ४ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. बापुराव मांजरे हे त्यांच्या शेतीत प्रतिवर्षी काही न काही तरी नवीन प्रयोग करत असतात. त्यातूनच यावर्षी टोमॅटो लागवडीचा निर्णय घेतला आणि तो सफल देखील झाला."

जुलै-ऑगस्ट महिन्यात पडलेल्या पावसाने बऱ्याच टोमॅटो शेतकऱ्यांचे तसेच भाजीपाला पिकांचे नुकसान केले. परंतु परंडा तालुका हा अजूनही दुष्काळग्रस्तच आहे. सीना कोळेगावचे (डोमगाव) मोठे धरण परंडा तालुक्यात असून देखील अजून त्यात पाण्याचा कसलाच साठा उपलब्ध नाही. सप्टेंबर महिन्यात पडलेल्या पावसामुळे आता कुठेतरी पाणीसाठा यायला लागला आहे. पण अशा खडतर प्रवासातून याच भागाला त्यांनी आपल्या टोमॅटो शेतीतून एक आदर्श घालून दिलाय.

## विक्रमी उत्पन्नाची पूर्वतयारी:

कमी पाण्यात आणि पावसाळी हंगाम लक्षात घेता त्यांनी पाण्याची कमतरता असल्यामुळे पावसावर आधारित नाविन्यपूर्ण काहीतरी उत्पादन घेता याव म्हणून टोमॅटोच्या 'सिजेंटा २०४८' वाणाचे पाऊण एकर क्षेत्रावर ११ जूनला ३५०० रोपांची लागवड रुंद सरी वरंबा पद्धतीने केली. पावसाळ्यात मल्चिंग पेपरचा उपयोग न करता त्यांनी तसेच रोप लागवड करून पाण्याचा निचरा करण्याची सोय केली. लागवडीपूर्वी त्यांनी ॲझोस्पिरील्लम व फॉस्फेट सोलुबिलायझिंग बॅक्टेरिया या जीवाणू संवर्धक खत पाण्यात मिसळून रोपांची मूळ त्यात बुडवून लागवड केली आणि एकरी १० टन शेणखत टाकले आणि तेही घरचेच आहे. कारण श्री. माजरे यांच्याकडे ४ गाई सुद्धा आहेत. तसेच एक एकर क्षेत्रावर वांग्याची लागवड केली आहे. पाण्याच्या सुविधेकरिता बोअरवेल आणि विहीर आहे. लागवडीच्या सुरवातीलाच जमिनीत मीठ टाकून नंतर रोपांची लागवड सायंकाळी केली.

## लागवड पद्धत व व्यवस्थापन:

लागवडीचे अंतर ८ x १.५ फुट असून द्राक्षाच्या जुन्या बागेत टोमॅटो लागवड करण्यात आली आहे. द्राक्षाचे फाउंडेशन असल्यामुळे बांधणी करिता लागणारा बांबू, तारा यांचा खर्च कमी झाला. पाण्याचे व्यवस्थापन हे ड्रीप पद्धत वापरून केले आहे. यावर्षी योग्य वेळी पिकासाठी लागेल असा पाऊस असल्याने पाण्याची जास्त गरज भासली नाही.

रासायनिक खतांमध्ये १२:६१:००, १३:४०:१३ या खतांचा वापर हा गरजेनुसार केला. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढण्यासाठी त्यांनी सूक्ष्म अन्नद्रव्ये खतांसोबत झाडांना दिले. हि खते एकत्रित न टाकता पिक वाढीच्या अवस्थेनुसार दर दिवशी ड्रीप पद्धतीच्या साह्याने देण्यात आली. यामुळे खतांची कार्यक्षमता वाढून ती पिकाला लवकरात लवकर उपलब्ध झाली. रासायनिक खतांचा अत्यंत कमी वापर करून एकात्मिक खत व्यवस्थापन यावर श्री. मांजरे यांनी भर दिला. टोमॅटोची वाढ झपाट्याने होत असल्यामूळे झाडांना आधार देण्याकरिता प्लास्टिक सुतळीच्या साह्याने प्रती ५-६ दिवसाला झाडे तारेवर बांधणी केली. झाडांची उंची हि साधारण सध्या ५-६ फुट आहे. सुरवातीलाच प्रत्येक झाडाला सरासरी ४५-५० फळे असल्यामुळे ती सुरक्षित ठेवणे तसेच त्यांची वाढ चांगली व्हावी याकरिता खतांचा योग्य वेळी वापर करून उच्च दर्जाची फळे तयार करण्यावर त्यांनी भर दिला आहे.



## कीड व रोग नियंत्रण:

टोमॅटो पिकावरील लवकर येणारा व उशिरा येणारा करपा रोगाचे नियंत्रण करिता, तसेच फळावर येणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी वेगवेगळ्या रासायनिक औषधी व काही जैविक औषधी यांचा काटेकोर वापर करण्यात आला. या सर्व रासायनिक आणि जैविक कीड व रोग नाशकांच्या फवारण्या आलटून पालटून ठराविक

अंतराने केल्या आहेत. त्यातून पानावर चकाकी तसेच कोणताही रोग झाडावर येऊ दिला नाही. या वर्षी पाऊस जरी चांगला असला पण हवामान बदलाचा सर्वात जास्त फटका हा खरीप पिकांना बसतोय. ढगाळ वातावरण व बदलत असलेल्या हवामानात फवारणीचा खर्च नक्कीच वाढला आहे. तरीही त्यावर मात करत चांगल्या दर्जाची फळे निर्माण करण्यावर श्री. मांजरे यांनी भर दिला.

### पिकाची काढणी व वर्गवारी:

पिकाच्या तोडणीस सुरवात लागवडीपासून साधारणतः ७५ व्या दिवशी सुरु करण्यात आली. सुरवातीच्या पहिल्या तोडणीस फक्त १५ कॅरेट निघाले. त्यानंतर मात्र उत्पादनात वाढ होत गेली. २-३ दिवसाआड तोडणी केली जात आहे. प्रत्येक तोडणीच्या वेळी ५०-६० कॅरेट निघत आहेत. योग्य ती प्रतवारी करून पिवळसर लाल टोमॅटो कॅरेट मध्ये भरले जातात. डाग पडलेले अथवा खराब फळे हि काढून टाकली जातात. दिवसभर तोडणी करून ती छोट्या ट्रॅक्टरच्या साह्याने बाहेर काढून, वर्गवारी करून सायंकाळी टेम्पो भरून हा माल जवळच असलेल्या कुर्डुवाडी येथील मार्केटला पाठवला जातो.







### आत्तापर्यंतचे उत्पादन, अपेक्षित उत्पन्न:

सप्टेंबर अखेर तब्बल १२ टन टोमॅटोचे उत्पादन निघाले असून अजूनही १४-१५ टन उत्पादन अपेक्षित आहे. सुरवातीला २५, २८, ३२, ४० रुपये प्रती किलो असा भाव मिळाल्याने आत्तापर्यंत ४ लाख रुपये उत्पन्न मिळाले आहे. पण पुन्हा सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात भाव कमी होऊन २८-३० प्रती किलो असा चालू आहे. पण अजूनही शेतात निम्मा माल बाकी असून यातून चांगल्या उत्पन्नाची अशा आहे.

### मांजरे यांच्या शेतीची वैशिष्ट्ये:

टोमॅटोच्या लागवडीपासून ते मार्केटला नेई पर्यंत अजून एकही मजूर कामाला लावला नाही. सर्व कामे हि मांजरे परिवारातील चारच जन करतात. त्यामुळे मजुरावर होणारा खर्च कमी होऊन खूप बचत होते. बापुराव मांजरे यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी, मुलगा दयानंद व सुन हेच खूप मेहनत करून प्रत्येक प्रयोग यशस्वी करून जास्तीत जास्त उत्पन्न मिळवण्यावर भर देतात. मांजरे यांच्याकडे शेतीची कामे सोपी व्हावी याकरिता एक मोठा व एक छोटा असे २ ट्रॅक्टर आहेत. तसेच त्याची सर्व अवजारे असल्यामुळे नांगरणी, पेरणी, काढणी, मळणी इ. वर होणारा अतिरिक्त खर्च कमी होतो. तसेच त्यांनी जानेवारी मध्ये ज्वारी काढणी यंत्र खरेदी केले आहे. त्यामुळे मजुराच्या समस्येवर देखील मात केली आहे. त्या यंत्राने आता सोयाबीनची देखील काढणी केली आहे. नेहमी कोणते न कोणते भाजीपाल्याचे पिक घेऊन सतत पैसे मिळवून देणारी पिके घेण्याचे ध्येय असते. मागील वर्षी एक एकर मध्ये त्यांना ३ लाखांचा कांदा झाला. लॉकडाऊन सुरु होण्याच्या आधीच २ लाख रुपयांचे खरबूज उत्पन्न घेतले. बापुराव मांजरे यांचा एक मुलगा कृषी विषयातील पदव्युत्तर पदवी शिक्षण (एम.एस्सी. कृषी उद्यानविद्या) घेऊन बीड येथील कृषी महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कृषिविषयक ज्ञानाचा श्री. मांजरे यांना मोलाचा फायदा होतोय.

### इतर पिके:

बापुराव मांजरे यांची स्वतःची १५ एकर शेती आहे. त्यात पाऊण एकर टोमॅटो, एक एकर वांगे, अर्धा एकर कांदा अशी भाजीपाला पिके लागवड आहे. उर्वरित क्षेत्रावर सोयाबीन, उडीद, बाजरी, मटकी, मका हि पिके घेतली आहेत. मागील वर्षापर्यंत २ एकर द्राक्षाची बाग होती, परंतु पाण्याच्या कमतरतेमुळे बाग काढून टाकावी लागली. त्याच बागेच्या जागेत अशी वेलवर्गीय पिके घेऊन उत्पन्न वाढवणे हेच एक उद्दिष्ठ आहे.

### पुढील नियोजन व सल्ला:

सोयाबीन, उडीद या पिकाच्या शेतावर डिसेंबर मध्ये खरबूज लागवड करणार आहेत. प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी ३-४ एकर खरबूज व एक एकर कलिंगड लागवड करणार आहेत.

“शेतीचे योग्य नियोजन केले आणि निसर्गाची साथ लाभली तर शेती फायद्याचीच आहे. सर्व कामे जर वेळेवर केली तर अतिरिक्त खर्च टाळता येऊ शकतो. शेतीकरिता घरचे सदस्य असणे खूप महत्वाचे आहे, म्हणजे मजुरावर होणारा खर्च कमी करून उत्पन्नात वाढ करता येईल. रासायनिक खतांचा वापर करत शेतकऱ्यांनी सेंद्रिय घटकांचा पण वापर करावा.”

(संपर्क: श्री. बापुराव मांजरे +९१ ९४२१५६३१४२, दयानंद बापुराव मांजरे +९१ ८९७५८८७५७२)

★★★